# Current Global Reviewer


Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal

PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

ISSN 2319-8648 | Impact Factor - 7.139 | Indexed (SJIF)

12 April 2021 Special Issue- 40 Vol. II


# Thoughts of Dr. B.R. Ambedkar





**Chief Editor**
Mr. Arun B. Godam

**Guest Editor**
Principal Dr. Kishan Pawar

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REFREED & INDEXED JOURNAL

SPECIAL ISSUE – 40 Vol II

Title of the issue : - Thoughts of Dr. B.R. Ambedkar

© All rights reserved with the College & publisher Price : Rs. 600/-

Editor – Arun Godam
Latur

Guest Editor
Principal Dr. Kishan Pawar

Published BY
Shaurya Publication
Old MIDC , Near Kirti Gold Chowk, Latur
Email- hitechresearch11@gmail.com , 8149668999

Printed By.
Shaurya Offset
Old MIDC , Near Kirti Gold Chowk, Latur
Email- hitechresearch11@gmail.com

EDITION :
April 2021

# Index

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

1. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे बौध्द धम्मा संबंधी विचार. 11
प्रा.डॉ.काळे.बी.एम

2. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे हिंदू कोड विल 13
प्रा.डॉ. भगवान डोंगरे

3. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जल व वियुत क्षेत्रातील योगदान 16
सहा. प्रा. डी.एन. रिठे

4. "विश्वविख्यात अर्थशास्त्रज्ञ डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार" 18
डॉ. देवराव सुखदेवराव मनवर

5. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार 26
प्रा. डॉ.अंभुरे एस. डी.

6. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री विषयक विचार 28
डॉक्टर संजीवनी चंद्रशेखर बाराहाते

7. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा भारतीय संविधानातील सामाजिक न्याय 30
प्रा.डॉ.विया खंडारे-गोवंदे

8. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार 32
प्रा. डॉ. अंबादास नरहरी बिराजदार

9. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार ३५
प्रा.डॉ.कातिर्क पोळ

10. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार 37
प्रा. प्रमोद केशवराव मुळे

11. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि शिक्षण 40
प्रा. डॉ. केशव अंबादास लहाने,

12. बाबासाहेबांचे वाचन- एक वेध 43
प्रा.डॉ.गिते लक्ष्मण बलभीम

13. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता : एक चिंतन 45
प्रा.डॉ.प्रभंजन चव्हाण

14. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्रिविषयक विचार 49
मोरे राधा देविदासराव

15. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री विषयक विचार 51
रत्नमाला सिताराम वेलदौडे

16. डॉ. आंबेडकर यांची प्राध्यापकाबाबतची विचार दृष्टी 53
प्रा.डॉ.रुद्देवाड बी.पी.

17. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षणविषयक विचार 55
सारिका मारोती दळवी

18. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जाती निर्मूलन विषयक विचार -एक दृष्टीक्षेप 57
प्रा. पोकळे एस.एम.

CURRENT GLOBAL REVIEWER
Special Issue 40, Vol. 2 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
April 2021 | SJIF | Impact Factor : 7.139

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे बौध्द धम्मा संबंधी विचार.

प्रा.डॉ.काळे.वी.एम
मराठी विभागप्रमुख, कै.रमेश वरपूडकर महाविद्यालय,सोनपेठ. ता.सोनपेठ.जि.परभणी (४३१५१६)

Late Ramesh Warpudkar College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

हिंदू धर्माच्या गुलामगिरीतून अस्पृश्यांना मुक्त करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जगातील सर्व धर्मांचा अभ्यास करून स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय व नीतीचा पुरस्कार करणा-या बुद्ध धम्माचा स्वतः स्वीकार केला आणि आपल्या लाखो अनुयायांना त्या धम्माची दीक्षा दिली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्ध धम्म स्वीकारताना बुद्ध धम्माचा सखोल अभ्यास करून मूळ स्वरूपात तथागत बुद्ध आणि धम्म स्वीकारला. याबाबत प्रा. यादव गायकवाड लिहितात, "डॉ. बाबासाहेबांनी पारंपरिक धर्मश्रद्धेमुळे प्रदूषित झालेल्या बौद्ध संघाला शरण जाण्याचे नाकारले तसे ध्यानस्थ पद्मासनातील बुद्धालाही नाकारले. त्यांनी सम्बुद्धत्व प्राप्त झालेला सिद्धार्थ, जो धम्मचक्राला गती देण्यासाठी परिक्रमा करतो, त्याचा स्वीकार केला." म्हणजे २५०० वर्षापूर्वी बुद्धाने पारंपरिक धर्मश्रद्धेला जो छेद दिला व समाजाला डोळस धर्मश्रद्धेचा नवा संस्कार दिला, तो बुद्ध त्यांना पुन्हा समाजासमोर नव्या ताकदीने उभा करावयाचा होता. अनात्मवादी, तर्कसुसंगत आणि ऐहिक भावपूर्ती करणार मूळ बुद्ध स्वीकारून बुद्धविचारांचा अन्वयार्थ लावत त्यांनी बुद्ध आणि त्यांचा धम्म ग्रंथाची निर्मिती केली.

या ग्रंथात त्यांनी बुद्धजीवन आणि बुद्धतत्त्वज्ञान यांविषयीच्या पारंपरिक दृष्टिकोनाला छेद देऊन विज्ञानवादी दृष्टिकोनातून बुद्ध धम्माची मांडणी केली. यासाठी त्यांनी काही निकष लावले. ते लिहितात, “पहिला निकष हा की, तर्कसुसंगतता आणि विचारशीलता नसेल तर ते वचन बुद्धाचे नव्हे. दुसरा निकष हा की, जे मानवास अकल्याणप्रद ते तथागतांचे नव्हे. तिसरा निकष म्हणजे, ज्याविषयी सम्यकज्ञान आहे व ज्याविषयी सम्यकज्ञान नाही अशा दोन विभागांत तथागतांचे विचारधन विभागलेले आहे. सम्यकज्ञान असलेल्या बाबीबद्दल तथागतांचे मतप्रदर्शन सार्वकालीन सुनिश्चित व अनुमानात्मक असे. सम्यकज्ञान नसेल, तर त्यांचे मतप्रदर्शन तत्कालीन व जुजबी असे.” बुद्धाच्या मूळ उपदेशात, काळाच्या ओघात भेसळ झाली होती. याचे अन्वेषण करण्यासाठी त्यांनी वरील निकष लावले. या कसोट्या वापरूनच त्यांनी बुद्धाची क्रांतिकारी मांडणी केली.

सिद्धार्थ गौतमाच्या गृहत्यागाबाबत डॉ. आंबेडकरांनी पारंपरिक कारणे नाकारून नवे वास्तव नोंदवले. शाक्य व कोलीय गणाच्या संघर्षाचा परिणाम म्हणून सिद्धार्थाने गृहत्याग केला, असे स्पष्ट मत नोंदवले. याबाबत डॉ. भाऊ लोखंडे लिहितात, "वयाने २९ वर्षांचा होईपर्यंत त्यांच्या नजरेत रोगी, म्हातारा, प्रेत किंवा संन्यासी न येणे ही अशक्य कोटीतील आणि तर्कदुष्ट घटना वाटते. याला ऐतिहासिक सत्य मान्यता येत नाही". शाक्य व कोलीय गणांत रोहिणी नदीच्या पाण्यावरून युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे करुणा व दयेने ओतप्रोत भरलेल्या हृदयाच्या सिद्धार्थ गौतमाला केवळ पाण्यासाठी रक्त सांडणे योग्य वाटले नाही. त्यामुळे गृहत्याग करून त्यांनी युद्ध टाळले. याबाबत यादव गायकवाड लिहितात,“सिद्धार्थाचा गृहत्याग हा मूलतः मानवी समाज संस्कृतीच्या उज्ज्वल भविष्यासाठी युद्धविरोधी मानसकितेचा आदिबंध आहे.

जीवनातील दु:खाला घाबरून प्रपंचाचा त्याग करणारा सिद्धार्थ पारंपरिक मिथ्समधून उभा राहतो. याउलट डॉ. आंबेडकरांनी सिद्धार्थाचे भव्य उदात्त दर्शन घडवले आहे. या संदर्भात वसंत मून लिहितात, “शाक्यसंघाच्या सभेतून परत आल्यानंतर त्याचे मातापिता नाना त-हेने त्याला समजावितात, स्वतः त्याचेबरोबर येण्याचा हट्ट धरतात, रडून आकांत करतात, परंतु सिद्धार्थाचे मन विचलित होत नाही. यशोधरा तर अतिशय, शांतपणे सिद्धार्थाच्या निर्णयाचे स्वागत करते. हा प्रसंग बाबासाहेबांच्या शब्दांत वाचताना सिद्धार्थाचे व यशोधरेचे जे भव्य दर्शन आपणांस घडते, त्याला तुलना नाही.” पारंपरिक कथेत सिद्धार्थ आई-वडील, पत्नी आणि पुत्र यांना न भेटता निघून जातो, असे दाखविले आहे. मातापितार्जीच्या मोहपाशांना घाबरणारा सिद्धार्थ त्यातून उभा राहतो मात्र वस्तुत तो तसा हे डॉ. आंबेडकरांनी वर्णन केलेल्या सिद्धार्थाच्या गृहत्यागाच्या प्रसंगावरून लक्षात येते. त्यातून धीरोदात्त सिद्धार्थाचे दर्शन घडते.

बुद्धांनी सांगितलेल्या चार आर्यसत्यांपैकी
१. या जगात दुःख आहे.
२. त्या दु:खाचा नाश करावयाचा आहे.

ही दोनच आर्यसत्ये बुद्धाला अभिप्रेत असल्याचे डॉ. आंबेडकरांचे मत असून, त्यांची दु:खविषयक कल्पना पूर्णत भौतिक असल्याचे वसंत मून स्पष्ट करतात.

बुद्धांनी देव, दैव, पुनर्जन्म, आत्मा, स्वर्ग-नरक, परलोक इत्यादी विषयांवर निकराचा हल्ला चढवला, गौतम बुद्धांचे कार्य सांगताना डॉ. यशवंत मनोहर लिहितात, “अज्ञान, विषमता, तुच्छता, अंधश्रद्धा यांच्या मागच्या अनेक शतकांचा अंधार जाळण्याचे कार्य बुद्धाने केले. बुद्धाने ईश्वर मानला नाही. आत्मा मानला नाही. बुद्ध इहलोकनिष्ठ होता. धर्म, संप्रदाय, ईश्वर, आत्मा, स्वर्ग-नरक, परलोक, पूर्वजन्म, पुनर्जन्म यांच्या संकटात सापडलेल्या समाजाला त्याने त्या संकटातून बाहेर काढण्याचा कार्यक्रम राबवला. माणसांना वरील सर्व गोष्टींपासून तोडून त्याने माणसाशी जोडण्याची मोहीम उभारली. माणूस हेच सर्वस्व मानले.” गौतम बुद्धांनी मानवी दुःखाचे कारण कोणतीही अधिदैविक शक्ती नसून मानवी दु:खाचे तसेच दु:खाच्या निवारणाचे कारण मनुष्यस्वभाव हेच आहे, हे त्यांनी सांगितले.

जगातल्या इतर धर्मप्रवर्तकांपेक्षा बुद्ध हे सर्वस्वी वेगळे व्यक्तित्त्व होते. हे वेगळेपण बुद्धाचे महानपण होते. ते निव्वळ निर्व्याज मानवीय होते. त्याचे कारण इसाई धर्माचा प्रवर्तक येशू ख्रिस्ताने स्वत:ला ईश्वराचा पुत्र मानून इसाद्वारेच ईश्वराकडे जाता

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Dist. Parbhani

आहे असे सांगितले. इस्लाम. धर्मसंस्थापक महम्मद पैगंबरनेही आत्मीच्या मुक्तिसाठी स्वतःला अल्लाचा दूत मानण्याची अनिवार्य शर्त ठेवली. भगवान श्रीकृष्णाने तर स्वतःला देवाधिदेव म्हटले आहे. परंतु, गौतम बुद्धाने मात्र असे काहीही केलेले नाही. याबाबत डॉ.भ.आनंद कौशल्यायन म्हणतात, "भगवान बुद्धने अपने धर्म में, अपने लिए कुछ भी विशेष स्थान नहीं रखा। किसी को मुक्त करने का आश्वासन नहीं दिया। उन्होंने कहा कि वे मार्गदाता हैं, मोक्षदाता नाही. बुद्धांनी स्वतःचा शब्द अंतिम मानला नाही. कोणतीही गोष्ट बुद्धीला पटेल तर स्वीकारा, अन्यथा तिचा त्याग करण्याचे, त्यात जरूर ती सुधारणा करण्याचे स्वातंत्र्य शिष्यांना दिले होते.

गौतम बुद्धांच्या महापरिनिर्वाणानंतर बुद्ध धम्मात हीनयान आणि महायान या दोन पंथांची निर्मिती झाली. या दोन पंथांपैकी हीनयान पंथीयांच्या मते गौतम बुद्धांचे वचन हे बुद्धांचे वचन असल्यामुळे बुद्धवचनांमध्ये बदल करू नये. याउलट महायान पंथीयांनी व्यावहारिक दृष्टिकोन नजरेसमोर ठेवून स्थलकालानुसार बुद्धवचनाचा गाभा तोच ठेवून बदल करण्यात काहीच हरकत नाही, अशी भूमिका घेतली. यामुळे महायान पंथाने बुद्धसूत्रांचे आणि विनयपीठाचे अर्थ बदलून घेतले. बरीच सूत्रे त्याज्य ठरविली. पाली भाषेलाही डावलून त्यांनी संस्कृतभाषेतून ग्रंथनिर्मिती केली.

महायान पंथाने केलेल्या बदलामुळे बुद्ध धम्मात कर्मकांडाचा समावेश झाला. त्याचा समाचार घेताना यशवंत मनोहर म्हणतात, महायान हा बुद्धधम्माचा विकास नव्हे, महायान बुद्धद्रोही आहे. महायानाने त्या काळच्या ब्राह्मणधर्माशी जुळवून घेतले. बुद्धाला महायानाने ईश्वर केले. त्याची भक्ती सुरू केली. बुद्धाच्या मूर्तीची पूजा सुरू केली. बुद्ध पुण्य देणारा, पाप नष्ट करणारा देव ठरला. नवसांना तो पावायला लागला. महायानाने बुद्ध नावाच्या तत्त्वज्ञ माणसाला पूर्णपणे हिंदू देव करून टाकले. बुद्धाची ऐतिहासिकता पुसून त्याला पूर्ण अलौकिक, पूर्ण दैवी रूप दिले." मूळ बुद्ध हा माणूस होता. आपल्याला कोणी प्रेषित वा अवतार मानू नये, असे बुद्ध कटाक्षाने सांगत असतानाही महायान्यांनी बुद्धाला देव मानले. "बुद्ध हे निरीदी आणि कर्मकांड यांच्या विरोधी असूनसुद्धा महायान वाङ्मयामध्ये ईश्वरवाद आणि कर्मकांड यांनी बस्तान बसविल्याचे दिसून येते." बुद्धाने ज्या पूजा, प्रार्थना, व्रतवैकल्ये, विधी, उपासना, भक्ती आणि मोक्षाची साधना या गोष्टी नाकारल्या होत्या, त्या सर्व महायानाने स्वीकारल्यामुळे महायान पंथ बुद्धापासून दूर गेला.

महायान्यांनी जातककथांची निर्मिती करून अनात्मवादी बुद्धाला आत्मवादी बनविले. बुद्धाच्या पूर्वजन्मासंबंधीच्या कथा म्हणजे जातककथा. आपल्या जन्मासंबंधीच्या कथा स्वतः बुद्धच सांगतो आहे, अशी या कथांची मांडणी आहे. या संदर्भात यशवंत मनोहर म्हणतात, "या जातककथातील प्रमेय बुद्धविरोधी आहे. त्याच्या विज्ञानदृष्टिविरोधी, बुद्धिवादविरोधी पुनःप्रस्थापित करण्यासाठी झाली".१०मूळ बुद्ध आत्माच मानत नसल्यामुळे पुर्नजन्माचा प्रश्नय उद्भवत नाही. जातककथांची निर्मिती ब्राह्मणी संस्कृतीचा, तिच्या मूल्यांचा प्रभाव पहाताचे प्रत्यंतर या जातककथांतून येते. त्यामुळेच राजा, दशरथ, राम, सीता, युधिष्ठिर, विदूर, श्रीकृष्ण या पौराणिक व्यक्तीही जातककथांतून येतात. आदिबुद्धाचा तंत्रसाधनेशी संबंध नसतानाही महायान्यांनी बुद्धाचा संबंध तंत्रसाधनेशी जोडल्याचे यशवंत मनोहर नमूद करतात.

संदर्भ ग्रंथः

1) बुध्द आणि त्यांचा धम्म- डॉ.बाबसाहेब आंबेडकर.
2) बौध्द धम्माची नवी फसल- प्रा.यादव गायकवाड.
3) बुध्द धम्मप्रदीप- मून वसंत.
4) डॉ.आंबेडकराचा बुध्द कोणता?- डॉ.यशवंत मनोहर.
5) भगवान बुध्द उनका धर्म- डॉ.म.आनंद कौशल्यायन.

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani